सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र . पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र.अभियो-१३२४/ प्र.क्र.७०/वि चौ-२(११-अ), दिनांक ०५ जून २०२५

**विषय** :- भ्रष्टाचार प्रतिबंध अधि नियम,१९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत.
एकत्रिक सूचना

******

**परिपत्रक** -

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.अभियो-१३२४/ प्र.क्र.७०/वि चौ-२(११-अ), दिनांक ०५ जून २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६०५१५५०३७०४०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 11-06-2025 14:40:01

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक ,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / नियोजन व समन्वय /कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा/ रा.रा.पो.बल/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन / प्रशिक्षण व खास पथके),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता / नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी का .क्र १ ते ४४.

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना "या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबाबत - एकत्रित सूचना**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: अभियो-१३२४/प्र.क्र.७०/विचौ-२ (११-अ)**

मंत्रालय, मुंबई -४०००३२

दिनांक — ०५ जून, २०२५

**संदर्भ**:-

१) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र: अभियो-१३१२/प्र.क्र.३०/पुनर्बांधित-१/११-अ, दिनांक: १२.०२.२०१३

२) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र: अभियो-१३१४/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक: ३१.०१.२०१५

३) शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र: अभियो-१६१५/प्र.क्र.७५/११-अ, दिनांक: २२.०८.२०१६

४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र: विचौअ-१६१९/प्र.क्र.४०/११-अ, दिनांक: १४.०१.२०२१

५) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र: अभियो-१६२१/प्र.क्र.५४/११-अ, दिनांक: २७.०१.२०२२

**प्रस्तावना** :-

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमंजूरीकरिता प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र.१ येथील दि.१२.०२.२०१३ च्या आदेशान्वये विहित केलेल्या कालमर्यादेत सक्षम प्राधिकारी यांच्याकडून अभियोग दाखल करण्याचे प्रस्ताव मंजूर/नामंजूर केले जात नाहीत, असे निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे क्षेत्रिय स्तरावरील सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा आढावा प्रशासकीय विभागांच्या स्तरावरुन घेण्याबाबतच्या सूचना देण्यात येऊनदेखील असा आढावा घेण्यात येत नसल्याची बाबदेखील निदर्शनास आली आहे.

त्यानुसार, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रकरणांत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतच्या सर्व सूचना एकत्रितरित्या निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भातील, उक्त नमूद शासन आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत.

**शासन परिपत्रक:-**

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत लोकसेवकांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त करुन घेण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या एकत्रित सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात येत आहेत.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत एकत्रित सूचना** :-

**(१) सक्षम प्राधिकारी**

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम १९ खाली खटला दाखल करण्यासाठी कोणाची पूर्वमंजुरी आवश्यक आहे याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यानुसार,

अ) राज्याच्या व्यवहाराशी संबंधित सेवेमध्ये असलेल्या व राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय सेवेतून काढून टाकता न येणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत त्या शासनाची,

ब) इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत त्याला त्याच्या पदावरुन काढून टाकण्याबाबत सक्षम असलेल्या प्राधिकरणाची पूर्वमंजूरी असल्याशिवाय, न्यायालय अपराधाची दखल घेणार नाही, अशी तरतूद आहे. ही तरतूद लक्षात घेता,

अ) (i) शासकीय सेवेतील गट अ मधील अधिकारी तसेच पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त या पदावर व त्यावरील पदांवर कार्यरत अधिकारी (ज्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ लागू आहेत) यांच्याविरुध्द अभियोग दाखल करण्यास मंजूरी देणारे सक्षम प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :-

| | | |
|---|---|---|
| १ | **राजपत्रित अधिकारी गट-अ**<br>सातव्या वेतन आयोगानुसार — वेतनस्तर एस-२३ (६७७००-२०८७००) किंवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतन स्तरात वेतन घेणारे अधिकारी | संबंधित प्रशासकीय विभागाने विभागाचे प्रभारी मंत्री यांचेमार्फत मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घ्यावी. |
| २ | **राजपत्रित अधिकारी गट-अ**<br>सातव्या वेतन आयोगानुसार — वेतनस्तर एस-२३ (६७७००-२०८७००) पेक्षा कमी वेतन स्तरात वेतन घेणारे अधिकारी व राजपत्रित गट-ब | संबंधित प्रशासकीय विभागाने विभागाचे प्रभारी मंत्री यांची मान्यता घ्यावी. |

अ) (ii) पोलीस सेवेतील पोलीस निरीक्षक या पदावर व त्यापेक्षा कमी दर्जाच्या पदावरील अधिकारी/ कर्मचारी (ज्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ लागू नाहीत) त्यांच्याविरुद्ध अभियोग दाखल करण्यास मंजूरी देणारे सक्षम प्राधिकारी पुढीलप्रमाणे असतील :-

| अ.क्र. | पदनाम | मंजूरी देणारे सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक<br>गट "अ" (राजपत्रित) | पोलीस महासंचालक |
| २ | सहायक पोलीस निरीक्षक,<br>गट "ब" (राजपत्रित) | विशेष पोलीस महानिरीक्षक किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचा अधिकारी |
| ३ | पोलीस उप निरीक्षक<br>गट "ब" (अराजपत्रित) | पोलीस उप महानिरीक्षक किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचा अधिकारी |
| ४ | सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई | पोलीस अधीक्षक / पोलीस उप आयुक्त किंवा त्यापेक्षा वरील दर्जाचा अधिकारी |

अ) (iii) शासकीय सेवेतील इतर अराजपत्रित गट-ब, गट-क व गट-ड मधील अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द अभियोग दाखल करण्यास यथास्थिती विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील .

अ) (iv) ज्या संस्थांना शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते अशा संस्थांमधील (उदा.महामंडळे/ मंडळे/ स्थानिक स्वराज्य संस्था,इ.) अधिकारी / कर्मचारी यांचे प्रकरणी, संबंधित प्रशासकीय विभागांनी, सक्षम प्राधिकारी शासन आदेशाद्वारे स्वतंत्ररित्या घोषित करावेत.

**(२) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रस्ताव सादर करताना अवलंबावयाची कार्यपध्दती.**

अ) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हे पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असतात. यामुळे, प्रस्तावावर जलद गतीने निर्णय होण्याच्या दृष्टीने महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्या मान्यतेने संबंधित अधिकारी / कर्मचा-यांविरुध्द अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागामार्फत पाठविण्याऐवजी थेट संबंधित प्रशासकीय विभागाकडे मान्यतेकरिता सादर करावा व त्याची प्रत गृह विभागाकडे पाठवावी. गृह विभागाने त्यांच्याकडे प्राप्त प्रस्तावांची प्रतदेखील संबंधित प्रशासकीय विभागाकडे आवश्यक कार्यवाहीकरीता पाठवावी.

ब) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा प्रकरणी घटना घडल्यानंतर ३ महिन्यांच्या आत तपासाचा अंतिम अहवाल अभियोग प्रस्तावासह व मसुदा दोषारोप पत्रासह (Draft charge sheet) तसेच, संबंधित कागदपत्रांसह संबंधितांकडे सादर करावा. अन्य प्रकरणात देखील (जसे अपसंपदा वगैरे) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने असे प्रस्ताव हे ३ महिन्यांच्या कालावधीत सादर करावेत.

क) घटना घडल्यानंतर वरीलप्रमाणे ३ महिन्यांच्या कालावधीत अभियोग दाखल करण्याचा प्रस्ताव संबंधितांकडे पाठविणे शक्य झाले नाही तर अशा प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील संबधित अधिकाऱ्यांनी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडून ३ महिन्यांची मुदतवाढ घ्यावी व शक्यतो या वाढीव मुदतीतच मसुदा दोषारोप पत्रासह (Draft charge sheet)अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर करावा.

ड) ज्या प्रकरणांत अशा प्रकारे घटना घडल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत मसुदा दोषारोप पत्रासह अभियोग दाखल करण्यास मंजूरी बाबतचा प्रस्ताव सादर होऊ शकणार नाही अशा प्रकरणांचा अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या स्तरावर तिमाही किंवा सहामाही आढावा घेण्यात यावा व त्यामधील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

**(३) एकाच प्रकरणात एकापेक्षा अधिक अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्यास पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात यावी:-**

अ) प्रकरणात एकाच विभागाचे गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एकत्रित प्रस्ताव सादर करावा व संबंधित प्रशासकीय विभागाने एकत्रित मंजुरी आदेश निर्गमित करावेत.

ब) प्रकरणात एकापेक्षा अधिक विभागातील गट-अ ते गट-ड मधील अधिकारी/कर्मचारी अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रशासकीय विभागवार स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत व संबंधित प्रशासकीय विभागांनी स्वतंत्र मंजूरी आदेश निर्गमित करावेत.

क) क्षेत्रिय स्तरावरील एकापेक्षा अधिक विभागातील गट-अ ते गट-ड मधील कर्मचारी अपचारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करावेत व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी स्वतंत्र मंजूरी आदेश निर्गमित करावेत.

ड) अन्य प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून संबंधीत नियुक्ती प्राधिकारीनिहाय प्रस्ताव परस्पर सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावेत.

**(४) प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी/ प्रशासकीय विभागांनी करावयाची कार्यवाही:-**

४.१) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त झालेले अभियोग मंजुरी मिळण्यासाठीचे प्रस्ताव, सक्षम प्राधिकारी यांच्यासमोर त्या प्रकरणात अभियोग दाखल करणे किंवा दाखल न करणे, या संदर्भातील उचित जाणीवपूर्वक निर्णयासाठी (Taking decision by application of mind) सादर करताना पुढील दोन बाबींवर सक्षम प्राधिकाऱ्याचे सुस्पष्ट आदेश मिळविण्यात यावेत.

i) अभियोग दाखल करणे किंवा दाखल न करणे या संदर्भात जाणीवपूर्वक निर्णय घेणे.
ii) अभियोग दाखल करावयाचा असल्यास अभियोग मंजुरी आदेशावर किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यास स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत करणे. (प्राधिकृत करावयाच्या अधिकाऱ्याचे नाव व पदनामासह)

४.२) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मसुदा दोषारोप पत्रासह (Draft Charge sheet) प्रशासकीय विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रशासकीय विभागाने अभियोग दाखल करणे किंवा दाखल न करणे या संदर्भात जाणीवपूर्वक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने प्राप्त कागदपत्रांची विस्तृत छाननी करावी.

i) वरीलप्रमाणे छाननीअंती अभियोग दाखल करण्यास अनुमती देण्यास योग्य प्रस्ताव असल्याचे (Fit) विभागाचे मत असल्यास, असा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे संदर्भ न करता, थेट सक्षम प्राधिकारी यांचेसमोर जाणीवपूर्वक निर्णयासाठी (Taking decision by application of mind) सादर करावा.

ii) छाननीअंती अभियोग दाखल करण्यास अनुमती देण्यात येऊ नये, असे विभागाचे मत असल्यास, किंवा अनुमती द्यावी किंवा देऊ नये याबाबत संबंधित विभाग निश्चित मत बनवू शकत नसेल, अशी प्रकरणे प्रथम विधी व न्याय विभागाकडे सादर करावीत व त्या विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घेतल्यानंतर ती प्रकरणे सक्षम प्राधिकारी यांच्यासमोर त्या प्रकरणात अभियोग दाखल करणे किंवा दाखल न करणे यासंदर्भातील उचित जाणीवपूर्वक निर्णयासाठी (Taking decision by application of mind) सादर करावीत.

४.३) उपरोक्त (i) व (ii) च्या अनुषंगाने ज्या प्रकरणात अभियोग दाखल करण्यास अनुमती देण्याचा निर्णय सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर होईल, अशा सर्व प्रकरणात शासकीय विधी विषयक कामकाजाचे नियम, १९८४ (Rules for the Conduct of Legal Affairs of Government, 1984) च्या नियम १० मधील तरतूदीनुसार मंजूरी आदेश (Sanction Order) प्रधान सचिव व विधी परामर्शी यांच्याकडे तपासणीसाठी पाठवावेत.

४.४) वरीलप्रमाणे सक्षम प्राधिकारी (तसेच आवश्यकतेनुसार विधी व न्याय विभाग यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर) शासन कार्यनियमावलीतील क्र.१३ मधील तरतूदीनुसार अशा मंजूरीबाबतचे आदेश किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने निर्गमित करावे. याकरीता -

i) अभियोग मंजुरीच्या आदेशावर स्वाक्षरी करण्यासाठी किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यास प्राधिकृत केल्याबाबतचे (अधिकाऱ्याचे नाव, पदनाम नमूद करुन) कार्यालयीन आदेश निर्गमित करावेत.

ii) वरीलप्रमाणे आदेश निर्गमित झाल्यावर, अभियोग मंजुरी आदेश प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात यावेत. मंजूरी आदेशात, अभियोग मंजुरीच्या आदेशावर स्वाक्षरी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यास प्राधिकृत केल्याच्या आदेशाचा क्रमांक व दिनांक याचा उल्लेख असावा.

**(५) सक्षम प्राधिकाऱ्यांकडे/ प्रशासकीय विभागांकडे प्राप्त प्रस्तावावरील कार्यवाहीचे वेळापत्रक:-**

i) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून, अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे/प्रशासकीय विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर अशा प्रस्तावावर (विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यासह) सक्षम प्राधिकाऱ्याची ३ महिन्यांच्या कालावधीत मंजूरी मिळविण्यात यावी व मंजूरी देण्यासंदर्भातील किंवा नाकारण्यासंदर्भातील आदेश ३ महिन्यांच्या कालावधीतच निर्गमित करण्यात यावेत.

ii) ज्या प्रकरणात सक्षम प्राधिकारी अभियोग दाखल करण्याच्या प्रस्तावास अनुमती नाकारतील अशा प्रकरणातील त्यांची मंजूरी नाकारणारे आदेश त्याबाबतच्या कारणमिमांसेसह त्यांच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्यास <u>७ दिवसांच्या आत माहितीसाठी</u> सादर करतील. (उदा. ज्या प्रकरणातील सचिवांच्या स्तरावर अभियोग दाखल करण्यास मंजूरी नाकारली असेल अशा प्रकरणातील आदेश मुख्य सचिवांना पाठविण्यात येतील. तर ज्या प्रकरणात प्रभारी मंत्री यांच्या स्तरावर अभियोग दाखल करण्यास अनुमती नाकारण्याचा निर्णय होईल, अशा प्रकरणातील आदेश त्याबाबतच्या कारणमिमांसेसह त्यांचे वरिष्ठ म्हणून मा. मुख्यमंत्री यांच्याकडे पाठविण्यात यावेत.)

iii) प्रत्येक महिन्यास मंत्रालयातील सर्व विभागाच्या सचिवांनी त्यांच्या विभागाअंतर्गत (खुद्द व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयांसह) ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी अभियोग दाखल करण्यास मंजूरीबाबत प्रलंबित प्रकरणाचे प्रमाणपत्र अशा प्रकरणी प्रलंबित राहण्याचे कारण व ते कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे त्यासह मुख्य सचिव यांच्याकडे सादर करावे.

iv) क्षेत्रिय स्तरावर गट-क व ड च्या कर्मचाऱ्यांबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग किंवा गृह विभाग किंवा प्रशासकीय विभागाकडून त्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीत सक्षम प्राधिकारी यांनी निर्णय घ्यावा व त्याबाबतचे सकारात्मक किंवा नकारात्मक आदेश कारणांसह निर्गमित करावेत.

v) क्षेत्रिय स्तरावर ज्या प्रकरणात अभियोग दाखल करण्याचे नाकारण्याचा निर्णय होईल, अशा प्रकरणातील परवानगी नाकारणारे आदेश त्याबाबतच्या निर्णयासह संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांना ७ दिवसांच्या कालावधीत माहितीसाठी पाठविण्यात यावेत. तसेच, अभियोग दाखल करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचा अहवाल देखील प्रशासकीय विभागाच्या सचिवांकडे पाठवावा.

vi) अभियोग दाखल करण्यास परवानगी नाकारण्याचा निर्णय सक्षम प्राधिकरणाने घेतला असेल तर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने संबंधित प्रकरणामध्ये पूर्वी सादर केलेल्या वस्तुस्थिती व्यतिरिक्त नवीन बाब/ पुरावा/ घटना पुढे निदर्शनास आणल्यानंतरच आदेशाचे पुर्नविलोकन करता येईल, अन्यथा केवळ सक्षम प्राधिकरणाने मंजुरी नाकारली या कारणास्तव पुर्नविलोकन करण्याबाबत केलेल्या विनंतीचा विचार करण्यात येऊ नये.

**(६) अभियोग दाखल करण्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने करावयाची कार्यवाही :-**

अ) अभियोग दाखल करण्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शक्यतो एका महिन्याच्या आत सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करावा.

ब) अशी मंजूरी प्राप्त झालेल्या प्रकरणांचा महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी त्यांच्या स्तरावर दरमहा आढावा घ्यावा व त्यामधील अडचणींचे निराकरण करावे.

क) अभियोग दाखल करण्यास मंजूरी दिलेल्या न्यायालयीन खटल्यांची सद्यस्थिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वेळोवेळी संबंधित विभागांना कळवावी.

**(७) अभियोगास मंजुरी देण्याच्या आदेशावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने द्यावयाच्या साक्षीबाबत-**

अभियोगास मंजुरी देण्याच्या आदेशावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना, सदर मंजुरी आदेशाच्या अनुषंगाने न्यायालयात साक्षीसाठी उपस्थित रहावे लागते.

साक्षीदरम्यान, मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यास, तो सदर प्रकरणी संबंधित आरोपी लोकसेवकास सेवेतून काढून टाकण्यास/अभियोगास मंजुरी देण्यास सक्षम आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली जाते. तेव्हा, सदर प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्याने मूळ नस्तीवर त्याच्या स्वाक्षरीने अभियोग दाखल करण्यास मंजुरी दिली आहे, सदर सक्षम प्राधिकारी त्या लोकसेवकास सेवेतून काढून टाकू शकतो आणि सक्षम प्राधिकाऱ्याने मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करण्यास मला प्राधिकृत केले असून त्याच्या वतीने मी साक्ष देत आहे, असा खुलासा मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने करणे आवश्यक आहे.

न्यायालयात उचित पद्धतीने साक्ष दिली न गेल्यास अभियोगास देण्यात आलेली मंजुरी अवैध ठरवून आरोपीस निर्दोष सोडले जाते किंवा विनादोषारोप सुटका केली जाते. यासाठी,

अ) मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने मंजुरी आदेशाबाबत साक्ष देण्यापूर्वी खालील कागदपत्रांचा अभ्यास करावा:-

१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव,
२) प्रस्तावासोबतची तपासाची सर्व कागदपत्रे,
३) सदर प्रस्तावाची नस्ती ज्या अधिकाऱ्यांमार्फत सक्षम प्राधिकाऱ्यास निर्णयासाठी सादर करण्यात आली, त्या अधिकाऱ्यांनी दिलेले अभिप्राय/शेरे,
४) विधी व न्याय विभागाचे / विधी अधिकाऱ्याचे अभिप्राय,
५) आरोपी लोकसेवकाच्या प्रकरणी मंजुरी आदेश देणारे सक्षम प्राधिकारी कोण आहेत, त्याबाबतचे शासनाचे सर्वसाधारण आदेश, मंजुरीच्या मूळ कागदपत्रांवर स्वाक्षरी करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नाव व पदनाम, मंजुरी आदेशावर स्वाक्षरी करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केल्याबाबतची टिप्पणी.

ब) वरीलप्रमाणे सर्व टिप्पण्यांच्या प्रमाणित प्रती, मंजुरीबाबतची मूळ नस्ती व संबंधित आदेश साक्षीस जाताना सोबत ठेवावेत.

क) प्रत्यक्ष साक्षीपूर्वी संबंधित शासकीय अभियोक्ता यांनी साक्षीदाराची पूर्ण तयारी करुन घ्यावी. तसेच, सुनावणीदरम्यान तपासणी/आवश्यकतेनुसार फेरतपासणी देखील घ्यावी. याबाबत गृह विभागाने सर्व संबंधित शासकीय अभियोक्त्यांना सूचना द्याव्यात.

ड) सर्व प्रशासकीय विभागांनी/क्षेत्रिय कार्यालयांनी अभियोगास मंजुरी देण्याच्या आदेशांवर स्वाक्षरी करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याचे आदेश निर्गमित करताना वरील सूचना त्यांच्या निदर्शनास आणण्याची खबरदारी घ्यावी.

**(८) संनियंत्रण समिती :-**

**अ) प्रशासकीय विभागाच्या स्तरावरील संनियंत्रण समिती :-**

संबंधित मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील गट-क व ड मधील कर्मचाऱ्यांविरुद्ध अभियोग दाखल करण्याच्या प्रस्तावासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत व ज्या प्रकरणांमध्ये अभियोग दाखल करण्यास विलंब होत असेल अशा प्रकरणासंदर्भात संनियंत्रणासाठी संबंधित विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे संनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) संबंधित मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव | : अध्यक्ष |
| २) संबंधित मंत्रालयीन विभागाअंतर्गत ज्या कार्यालयामधील प्रकरणे प्रलंबित असतील त्या कार्यालयाचे विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख | : सदस्य |
| ३) संबंधित मंत्रालयीन विभागाचे सह/उप सचिव (आस्थापना) | :सदस्य सचिव |

**ब) मंत्रालयीन स्तरावरील संनियंत्रण समिती :-**

गट-अ व ब मधील अधिकाऱ्यांविरुद्ध अभियोग दाखल करण्याबाबतच्या प्रलंबित प्रकरणाबाबतचे संनियंत्रण करण्यासाठी राज्य स्तरावर खालीलप्रमाणे संनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) मुख्य सचिव:- | : अध्यक्ष |
| २) अपर मुख्य सचिव (गृह) | : सह अध्यक्ष |
| ३) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | : सदस्य |
| ४) प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग | : सदस्य |
| ५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (सेवा), सा.प्र.वि. | :सदस्य |
| ६) संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव | : सदस्य |

मंत्रालय स्तरावरील संनियंत्रण समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही गृह विभागामार्फत करण्यात यावी.

**क)** वरील दोन्ही संनियंत्रण समित्या ह्या संबंधित प्रकरण कोणत्या टप्प्यावर व कोणत्या कारणासाठी प्रलंबित आहे याबाबत वेळोवेळी आढावा घेतील व त्यासंदर्भातील पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागांना मार्गदर्शन करतील. संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या मार्गदर्शनाच्या आधारे प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निर्णयासाठी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर करतील.

**(ड) शासकीय सेवकांच्या सेवा पंच-साक्षीदार म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत:-**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाचेचा सापळा किंवा घरझडतीच्या कामासाठी योग्य शासकीय सेवकांच्या सेवा पंच-साक्षीदार म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत किंवा अन्य सहकार्यासाठी विनंती करण्यात आल्यास अशा प्रकरणी त्वरीत सहकार्य दिले जाईल याची दक्षता विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

**(९) न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्याबरोबरच करावयाची इतर कार्यवाही:-**

अ) विभागीय चौकशी नियम पुस्तिका (चौथी आवृत्ती), १९९१ मधील परिच्छेद ४.२ मध्ये फौजदारी कार्यवाहीच्या तुलनेत विभागीय कारवाई करण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचा पुन:रुच्चार शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र. सीडीआर- १०९७/प्र.क्र.४६/९७/११, दि.१८/११/१९९७ अन्वये करण्यात आलेला आहे. फौजदारी खटला दाखल केला असला तरीही विभागीय चौकशी आदेशित करता येऊ शकते. फौजदारी खटल्याचा निर्णय लागण्यास बराच कालावधी लागतो व त्यामुळे संबंधितांवर तात्काळ कारवाई करणे शक्य होत नाही. विभागीय चौकशी नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र. ४.२ खालील तिसऱ्या पर्यायानुसार फौजदारी खटला भरण्याबरोबरच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी चालू करण्यासंदर्भात (चालू करावी किंवा आवश्यकता नाही) शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांच्या स्तरावर जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात यावा.

**अभियोग दाखल करण्यास मंजूरी दिल्याबाबतची नोंद संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात घ्यावी.**

ब) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी सुरु न करण्याचा जाणीव पूर्वक निर्णय सक्षम प्राधिकाऱ्याने घेतला असल्यास त्याबाबतची समर्पक कारणे नमूद करण्यात यावीत.

**विभागीय चौकशी सुरु केली असल्यास त्याबाबतची नोंद संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात घ्यावी.**

क) लाचेचा सापळा प्रकरणी (मानीव निलंबन वगळता) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर अपचारी अधिकारी /कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्याची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्यांनी करावी.

**(१०)** क्षेत्रिय स्तरावर व संबंधित प्रशासकीय विभाग तसेच, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून वर विहित पद्धतीनुसार व वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी व विलंब टाळण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०६०५१५५०३७०४०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.06.05 15:52:08 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,

३) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव,
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
७) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
८) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,
९) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा,
१०) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद,
११) सर्व मा. विधीमंडळ सदस्य
१२) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१३) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
१४) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१५) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
१८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२१) आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२३) सर्व विभागीय आयुक्त,
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व मंत्रालयीन विभाग मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख तसेच प्रादेशिक विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख
२६) निवडनस्ती (विचौ-२)